वर्ष : १९८७

आकर्षक व्याजाच्या फसवणुकीचा धंदा

मद्रास येथे मुख्य कार्यालय असलेल्या "ओरिएंटल फायनान्स अॅन्ड एक्स्चेंज कंपनी"ने अत्यंत आकर्षक अशा जाहिराती प्रसिद्ध केल्या व त्यात लोकांकडून २८ टक्क्यापासून ते ३५ टक्क्यांपर्यंत व्याजदर असलेल्या ठेवी मागविण्यात आल्या होत्या. मोनोपॉलीज अॅन्ड रिस्ट्रिक्टिव्ह ट्रेड प्रॅक्टिसेस कमिशनने केलेल्या चौकशीमध्ये या जाहिरातीतले दावे खोटे असल्याचे आढळून आले. याचप्रमाणे, अशाच एका कंपनीचे गैरव्यवहार १९८१ मध्ये उघडकीस आले. "संचयिता इन्वेस्टमेंट" ही कंपनी नव्हतीच, ती एक भागीदारी संस्था, ४८ टक्के व्याजदर जाहीर करून कंपनीने शंभर कोटीं रुपयांपेक्षा जास्त रक्कम गोळा केली. सर्वोच्च न्यायालयाने नियुक्त केलेल्या एका निवृत्त न्यायाधीशाच्या नेतृत्वाखालील चौकशी समितीकडे 'संचयिता' बद्दल १.६ लाख तक्रार अर्ज प्राप्त आले आहेत.

विशेषतः दक्षिण भारतामध्ये या संस्थांचं चांगलच पेव फुटलं आहे. बंगलोरच्या एका गुंतवणूक संस्थेने ठेवीदारांना ३३ टक्के व्याज देण्याचं कबूल केले. सुमारे दहा लाख रुपये किंमतीचा फ्लॅट राहण्यासाठी देखील देऊ केला. परदेशी नोकरी मिळवून देण्याचे आश्वासन आणि एम्.बी.ए. किंवा पी.एच्.डी. सारखी मोठी पदवी टपालाद्वारे प्राप्त करून देणारीही एक कंपनी होती. मद्रासच्या 'मद्रास बँकर्स' या कंपनीने एक वेगळी शक्कल लढवली. कंपनी म्हणवून घेणाऱ्या या भागीदारी संस्थेचे स्वतःचे शेअर्स लोकांना देऊ केले. एक शेअर्स रू.९७०/- किमतीचा होता आणि त्यावर ३० रूपये प्रत्येक महिन्याला हमखास लाभांश! फिक्स्ड डिव्हिडंड मिळणार असे जाहीरातीत म्हटले होते. वास्तविक, "लिमिटेड कंपनी"लाच आपले शेअर्स विक्रीला काढता येतात. भागीदारी संस्थांना नाही, अशी कायदेशीर तरतूदही आहे. त्याचप्रमाणे रिझव्ह बँकेच्या नियमानुसार वर्गीकृत व्यापारी बँकांशिवाय इतर कोणत्याही संस्थेला आपल्या नावात 'बँकर, बँक अथवा बँकिंग' हे शब्द वापरण्याची परवानगी नाही. मद्रास ‘बँकर्स’ ने ‘बँकर्स’ हा शब्द तर आपल्या नावात वापरलाच शिवाय शेअर्सही विक्रीला काढले.

अर्नाकुलम, कोचीन येथील ‘टोनी चेन्नाकडन कंपनी (टी.सी.सी.)’ने दोन वर्षाच्या ठेवीवर ३१ टक्के व्याजदर जाहीर केले. 'केरळ मनी लेंडर्स' ॲक्टनुसार केरळ सरकारने व्याजदराची मर्यादा १२ टक्के निश्चित केली आहे. तरी देखील या कंपनीच्या जाहिरातींवर वा प्रत्यक्ष व्याजदर गोळा करण्यावर बाधा आली नाही. केरळमधीलच आणखी एका कंपनीने पाच वर्षाच्या ठेवीवर ४० टक्के व्याजदर घोषित केला. दिल्लीच्या "सुप्रीम ट्रेडिंग कॉर्पोरेशन" ने वेगळीच युक्ती केली. या संस्थेची आद्याक्षरे एस.टी.सी. अशी असल्याने शासनाच्या ‘स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन’ च्या आद्याक्षरासारखीच आहेत. या गोष्टीचा संस्थेच्या प्रसिद्धी पत्रकात आणि माहितीपत्रकात अतिशय चतुराईने उपयोग करून घेण्यात आला.

याखेरीज ‘सुप्रीम ट्रेडिंग कॉर्पोरेशन’ च्या "स्कीम ए" नुसार ५०,००० रूपयांच्या ठेवीवर ४८ टक्के वार्षिक व्याजदराने दर महिन्याला व्याज दिले जाईल असे म्हटले होते. "स्कीम बी " नुसार रू.५०,००० सहा महिन्यासाठी गुंतवल्यास ३६ टक्के दराने व्याज मिळण्याची सोय होती. "स्कीम सी" मध्ये तीन महिन्यांच्या मुदत ठेवी २४ टक्के दराने व्याज मिळण्याची सोय होती. कळस म्हणजे "स्कीम डी" मध्ये एका वर्षात रक्कम दुप्पट होण्याचे आश्वासन होते. "ला बेला फायनान्सर" नावाच्या दक्षिण भारतातील एका कंपनीने आपल्याकडील ठेवींच्या परतीची हमी राष्ट्रीयकृत बँकांनी घेतली असल्याचे जाहिरातीमध्ये म्हटले होते.

महाराष्ट्रातील आदित्य प्रकरण

या कंपनीचे रजिस्टर ऑफिस लमिंग्टन रोड, मुंबई येथे तर रिजनल ऑफिस ठाणे येथे आहे. महाराष्ट्रात विविध भागामध्ये आदित्यने आपल्या शाखा उघडल्या. कर्नाटकात यापूर्वीच 'आदित्य'ने लोकांना १८ कोटी रुपयांना लुबाडले आहे. कर्नाटक गुप्तचर खाते त्याचा तपास करीत आहे. आदित्यच्या महाराष्ट्रात असलेल्या शाखादेखील बंद पडत चालल्या आहेत. बेसावधपणे आणि व्यवस्थित माहिती करून न घेता पैसा गुंतवल्यास कशी पश्चाताप करण्याची वेळ येते याचा मराठी माणसाने देखील अनुभव घेतला आहे.

या सगळ्या पार्श्वभूमीवर सामान्य गुंतवणूकदाराच्या मनात असा प्रश्न येणे स्वाभाविक आहे की, एवढी गंभीर प्रकरणे घडत असताना शासन किंवा रिझर्व्ह बँक काय करीत आहे? या प्रश्नाची शासनाला अजिबात जाणीव नाही काय? ज्या ठेवीदारांचे पैसे बुडाले, त्यांचे नुकसान कसे भरून काढायचे आणि यासाठी काही कायमस्वरूपी इलाज करण्याचा शासनाचा विचार आहे काय?

मुळातच अशा कंपन्यांच्या कारभारामुळे केंद्रीय अर्थखाते आणि रिझर्व्ह बँक व राज्य सरकारे यांच्यापुढे अनेक प्रश्न निर्माण झाले होते. या प्रश्नांचे प्रासंगिक आणि मूलभूत अशा दोन प्रकारांत वर्गीकरण करता येऊ शकेल. कंपन्यांनी ज्या गुंतवणूकदारांना बुडवले, त्यांना त्यांचे पैसे परत कसे मिळवून द्यायचे आणि या गुंतवणूकदारांच्या क्षोभाला कसे तोंड द्यायचे. या संदर्भातल्या प्रासंगिक प्रश्नांखेरीज, अशा कंपन्यांची वाढ कशी थांबवायची आणि या प्रकरणांमुळे गुंतवणूकदारांच्या मनात एकूणच कंपन्यांमधल्या गुंतवणुकीबद्दल निर्माण झालेला अविश्वास कसा दूर करायचा आणि शिवाय यामुळे संपूर्ण देशाच्या अर्थ व्यवस्थेवर होऊ शकणारे दूरगामी अनिष्ट परिणाम कसे टाळायचे वगैरे मूलभूत प्रश्न देखील उभे राहिले.

रिझर्व्ह बँकेची भूमिका

वित्तसंस्थांचा कारभार नियंत्रित करण्याबाबत रिझर्व बँकेचे अधिकार "रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ॲक्ट, १९३४" या कायद्यानुसार आहेत. १९८० साली या कायद्यातील "३सी" या कलमात एक नवीन तरतुदीची भर घालण्यात आली. या तरतुदीचा उल्लेख, त्यामधील त्रुटी यांचा ऊहापोह प्रस्तुत लेखात याआधी करण्यात आलेला आहेच.

कंपनीच्या ठेवीवरील व्याजदराबाबत रिझर्व बँकेची मर्यादा समजावून घेतली पाहिजे. रिझर्व्ह बँकेस फक्त व्यापारी बँकेच्या ठेवीवरील व्याजदर ठरविण्याचे अधिकार आहेत. परंतु कंपन्यांनी किती व्याजदर जाहीर करावा. यावर रिझर्व्ह बँकेचे कोणतेही नियंत्रण नाही. असे असले तरी लोकांकडून कंपनीबद्दल ठेवीसंदर्भात काही तक्रारी आल्यास, रिझर्व्ह बँक कंपनीविरुद्ध काही कृती करू शकते.

प्रथमच ज्या कंपन्यांविरूध्द जनतेच्या तक्रारी आहेत, त्या कंपन्यांकडून रिझर्व्ह बँक लेखी स्पष्टीकरण मागू शकते. याद्वारे संबंधित ठेवीबद्दल पूर्ण माहिती रिझर्व्ह बँक मिळवू शकते. परंतु बहुतेक कंपन्या असे स्पष्टीकरण देण्याचे टाळतात, असे आढळून आले आहे. अशा वेळेस रिझर्व्ह बँक "कलम ४५ टी" नुसार, स्थानिक मॅजिस्ट्रेटकडून कंपनीविरुद्ध शोध वॉरंट काढू शकते व पोलिसांच्या मदतीने कंपनीच्या कार्यालयावर धाड घालून संबंधित कागदपत्रे जप्त करू शकते. या सगळ्या कारवाईत कंपनीने कायद्याचा भंग केल्याचे आढळून आले, तर रिझर्व्ह बँक न्यायालयात कंपनीविरुध्द खटला दाखल करते. न्यायालयात गुन्हा सिद्ध झाल्यावर दोन वर्षे तुरुंगवास आणि दंड अशी शिक्षा होऊ शकते. याच स्वरूपाचे अधिकार राज्य सरकारला देखील आहेत. राज्य सरकार देखील अशा कंपनीविरुद्ध अशा प्रकारची कारवाई करू शकते. त्यासाठी राज्य सरकार विक्रीकर अधिकाऱ्यांची मदत घेते.

राज्य सरकारची भूमिका

बोगस कंपन्यांच्या हालचालींना पायबंद घालण्यासाठी राज्य सरकार पुरेसे सहकार्य देत नाही. अशी रिझर्व बँकेची तक्रार असली तरी, त्याबाबत राज्य सरकारांचे काही म्हणणे आहे. राज्य सरकारांच्या मते, संपूर्ण देशाचे अर्थकारण प्रामुख्याने रिझर्व बँकेच्या हाती असल्याने वित्तसंस्थांच्या कारभारावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी पूर्णपणे रिझर्व बँकेची आहे. तरीपण रिझर्व्ह बँकेला हवी असणारी पोलिसांची मदत वगैरे देऊ करायला आम्ही तयार आहोत, असे असताना गेल्या दहा-बारा वर्षात रिझर्व्ह बँकेला या समस्येची जाणीव झाली नाही, हे या कंपन्यांच्या संस्थेतील बाबीवरून दिसून येते. केरळसारख्या राज्यात तर या कंपन्यांचे राजकारणात प्रस्थ माजले आहे. उशिरा जाग आल्यावर रिझर्व्ह बँकेने पुरेसे सहकार्य नसल्याचे कारण पुढे करून दोघांचे खापर राज्य सरकारवर फोडणे योग्य नाही.

या प्रकरणाबाबत रिझर्व्ह बँक आणि राज्य सरकारे, दोघांचीही बाजू लक्षात घेतल्यावर हे कळून येते की, परस्परांच्या अधिकारांबाबत आणि कायद्यातील तरतुदींबाबत अस्पष्टता आहे. रिझर्व्ह बँक ठेवीदारांच्या संस्थेवर बंधन घालते आणि राज्य सरकार कंपनीच्या कर्जे देण्याच्या

व्यवसायावर काही नियंत्रणे घालू शकते. मग ठेवींच्या रकमेवर आणि व्याजदरावर नक्की नियंत्रण कुणाचे? या गोष्टींचा सोयिस्करपणे बोगस कंपन्या फायदा उठवतात. ठेवींबाबतच्या व्यवहारांची जबाबदारी रिझर्व्ह बँक आणि राज्य सरकारे परस्परावर ढकलताना दिसतात. याऐवजी दोघांनीही एकत्रितपणे कृती करण्याचा निर्णय घेणे योग्य ठरेल.

केरळमधील परिस्थिती

गेल्या दहा वर्षापासून केरळमध्ये अनेक बोगस कंपन्यांनी अक्षरशः धुमाकूळ घातला. लाखो गुंतवणूकदाराना या कंपन्यानी लुबाडले. केरळ सरकारने यासाठी कायद्यात तरतुदी देखील केल्या होत्या. परंतु अंमलबजावणी यंत्रणेची अक्षमता हे एक प्रमुख कारण तरतुदींच्या अपयशामागे होते. बोगस कंपन्यांच्या व्यवहारापुढे केरळची अर्थव्यवस्था अडचणीत येण्याचे प्रमुख कारण या व्यवहारांमध्ये आखाती देशातील पैशाचा ओघ वापरात येऊ लागला. १९७० ते ८० या दशकात या कारणांमुळे समस्या अधिकच उग्र स्वरूप धारण करू लागली.

अनेक कंपन्यांच्या भरमसाठ व्याजदराच्या आकर्षक जाहिरातींना सामान्य गुंतवणूकदारच नव्हे तर राजकीय नेते, पोलिस अधिकारी या सारख्या जबाबदार लोकांनी सुद्धा यामध्ये रस घेतला व ते या प्रलोभनाला बळी पडले. गुंतवणूकदारांच्या तक्रारी वाढू लागल्या. केरळ सरकारला १९५८ च्या 'मनी लेंडर्स ॲक्ट' मधील त्रुटींची जाणीव होऊन ताबडतोब उपाय योजणे भाग पडले. यासाठी केरळमधील सत्तारूढ मार्क्सवादी डाव्या आघाडीने एक आदेश जाहीर केला. आदेशानुसार कंपन्यांच्या व्याजदरावर बंधन घालण्यात तसेच वित्त संस्थांच्या हिशेबाची नियमितपणे तपासणी व अधिकाऱ्यांकडे ठराविक कालावधीनंतर जमाखर्च देण्याची सोय करण्यात आली. या आदेशाचा भंग करणाऱ्यांना तीन वर्षाच्या तुरुंगवासाची शिक्षा देण्याची तरतूद करण्यात आली.

कलकत्ता स्टॉक एक्स्चेंजच्या सूचना

ठेवींच्या परतफेडीबद्दल कलकत्ता स्टॉक एक्सचेंजकडे अनेक तक्रारी आल्याने अध्यक्षांनी रिझर्व बँकेला कंपनीच्या ठेवी गुंतवणूकदारांना परत करण्यावर लक्ष ठेवण्याची विनंती केली. यासाठी कंपन्यांच्या व्यवस्थापनाने आपल्या नव्या ठेव योजनांची माहिती रिझर्व्ह बँकेस कळवणे आवश्यक आहे. कंपनीचे एकूण कामकाज आणि नवे प्रकल्प याविषयी कंपनीने वेळोवेळी गुंतवणूकदारांना माहिती देणे आवश्यक आहे.

रिझर्व बँकेच्या उपायोजना

कायद्यातील तरतुदींची कडक अमलबजावणी होत आहे की नाही, हे पाहण्याचे अधिकार रिझर्व्ह बँक तसेच राज्य सरकारी अधिकाऱ्यांना देण्यात आलेले आहेत. कायदेशीर तरतुदींना मोठ्या प्रमाणात प्रसिद्धी देण्याचे ठरविण्यात आले आहे. त्यासाठी जिल्हा पातळीवरील अधिकारी आणि पोलीस खाते यांनाही सूचना देण्यात आल्या आहेत. यासाठी रिझर्व्ह बँकेची विविध खाते, राज्य सरकारशी सतत संपर्क ठेवणार आहे. या पुढील काळात राज्यसरकार आणि बँक परस्पर सहकार्याने बेकायदेशीर कंपन्याविरुद्ध कृती केली जाणार आहे. याशिवाय अनेक माहिती पत्रकांद्वारे जनतेला अशा कंपन्यापासून सावध रहाण्याचे आवाहन देखील रिझर्व्ह बँक वारंवार करीत आहे.

अनेक उपाय योजना अंमलात येत असल्या तरी, यापूर्वी ठेवी बुडविल्या गेल्या आहेत, अशा गुंतवणूकदारांनी काय करायचे हा प्रश्न अनुत्तरीत आहे. सध्यातरी पोलिस, रिझर्व्ह बँक आणि राज्य सरकारे या सर्वांनाच हा प्रश्न भेडसावत आहे.

ही परिस्थिती दोन अर्थांनी चिंताजनक आहे. एक म्हणजे, सामान्य जनतेचा एकूणच कंपन्यावरचा विश्वास उडत चालला आहे, आणि याची झळ नव्यानेच प्रगतीची सुरुवात करणाऱ्या चांगल्या कंपन्यांना पोहोचण्याची शक्यता आहे. दुसरे असे की, शेअर बाजार नुकताच मंदीच्या अवस्थेतून सावरत असल्याची चिन्हे दिसत असली, तरी देखील तेथील परिस्थितीला समाधानकारक म्हणता येणार नाही. कारण अनेक नव्या शेअर्सच्या प्रस्तावांना पुरेसा प्रतिसाद मिळत नाही, ही वस्तुस्थिती आहे. अशा वेळेस, मुदत ठेवीमधील लोकांची गुंतवणूक देखील मोठ्या

प्रमाणात कमी झाल्यास देशातील एकूणच उद्योग व्यवसायाला भांडवल उभारणीच्या मोठ्या समस्येला तोंड द्यावे लागेल, आणि हे आपल्या राष्ट्राला सध्या नक्कीच परवडणारे नाही.

कायद्यामध्ये सुधारणा आवश्यक

उपरोक्त विवेचनावरून मुदतठेवींमध्ये गुंतवणूक करणारे गुंतवणूकदार किती असुरक्षित आहेत. हे स्पष्टपणे लक्षात येऊ शकेल. तेव्हा या गुंतवणूकदारांचे हितसंबंध राखण्याकरिता सध्याच्या कायद्यांमध्ये काही सुधारणा करणे आवश्यक आहे. या सुधारणा खालील स्वरुपाच्या असाव्यात अशा सूचना करण्यात आल्या आहेत.

१. प्रत्येक कंपनीने मुदत ठेवीधारकांना आणि कर्ज देणाऱ्या वित्त संस्थांना ठराविक कालमर्यादेनंतर रक्कम परत मिळण्याची लेखी स्वरूपात हमी द्यावी.
२. ज्या कंपन्या मुदत ठेवीची परतफेड करू शकलेल्या नाही, हे स्पष्ट होईल, त्या कंपन्यांना कर्जरोखे, हक्कभाग वगैरे मार्गाने भांडवल बाजारात प्रवेश करण्यास प्रतिबंध करण्यात यावा.
३. मुदत ठेवीच्या व्याजाची रक्कम जी कंपनी देऊ शकलेली नसेल तिच्या, अर्जाचा वित्तसंस्थांनी कर्ज मंजुरीसाठी अजिबात विचार करू नये.
४. ठराविक कालावधीनंतर, उदा. तीन महिने / सहा महिने वगैरे प्रत्येक कंपनीने कंपनीला बोर्डाकडे मुदतठेवींचे अगर त्यावरील व्याजाचे देणे कंपनीस नसल्याचे प्रमाणपत्र सादर करायला हवे.

विमा संरक्षण निधी

कंपनी कायद्यामध्ये मुदत ठेवीधारकांच्या हितरक्षणासंदर्भात नव्या सुधारणा करण्याबद्दलच्या अनेक सूचना देशभरातील विविध अर्थतज्ञाकडून येत असतानाच एक नवी योजना देखील मांडली जात आहे. ती म्हणजे मुदत ठेवी धारकांसाठी विमा संरक्षण निधी उभारणे.

विमा संरक्षण निधी हे या समस्येचे योग्य उत्तर असू शकेल असे वाटते. मुदत ठेवीच्या रक्कमेवर विम्याचे संरक्षण मिळवणे हे या कल्पनेमागचे मुख्य सूत्र आहे, ही योजना राबविण्यासाठी सध्याच्या कायद्यात काही बदल करावे लागतील आणि विमा योजनेची देखील शासनाला तरतूद करावी लागेल.

या विमा योजनेनुसार ५,००० रुपयांपर्यंतच्या मुदत ठेवींचा कंपनीला विमा उतरवावा लागेल. अर्थातच, विम्याचे हप्ते भरण्याची जबाबदारी कंपनीचीच असेल. हप्त्याची रक्कम चांगल्या कंपन्यासाठी कमी असेल आणि ती इन्शुरन्स कंपनी त्या कंपनीच्या स्वरूपावरून आणि माहितीवरून ठरवेल. दरवर्षाला ही हप्त्याची रक्कम इन्शुरन्स कंपनी बदलू शकेल. ती कंपनी मुदत ठेवीची परतफेड करू न शकल्यास ठेवीदाराला इन्शुरन्स कंपनी परतफेड करील आणि कंपनीकडून ठेवीचे पैसे परत मिळाल्यावर प्रयत्न सुरू करेल.

या योजनेमुळे कंपन्यांवर जादा आर्थिक ताण पडेल असे वाटण्याची शक्यता आहे. परंतू मुदत ठेवीवरील व्याजदर नुकताच 'एप्रिल ८७' मध्ये १५ टक्क्यावरून १४ टक्क्यांवर शासनाने आणला आहे. तेव्हा कंपन्यांना हा विम्याचा हप्ता भरणे तितकेसे जड जाऊ नये.

अर्थातच, या योजनेचा पूर्णांशाने आणि व्यावहारिक विचार करून अंमलबजावणीचा प्रयत्न हाती घ्यावा लागेल. परंतु मुदत ठेवी धारकांना ही योजना निश्चितच दिलासा देणारी आहे असे वाटते.

******

विविध वृत्तपत्रांतून सध्या ठेवीदारांना फसवून बंद पडणाऱ्या संस्थांची वृत्ते येत आहेत. या संस्थांची एक विशिष्ट कार्यपद्धती आहे आणि कायद्यातील काही ठराविक पळवाटांचा आधार त्या घेत असतात. प्रत्येक गुंतवणूकदाराने म्हणूनच सावधान रहाणे आवश्यक ठरते. या संदर्भातील संस्थांची माहिती, त्यांची कार्यपद्धती, कायद्यातील तरतुदी आणि रिझर्व्ह बँक, राज्य सरकारे व

केंद्रीय अर्थखाते यांनी आर्थिक गुन्हेगारीविरुद्ध उचललेली पावले याबाबतीत हा लेख दोन भागांमध्ये प्रसिद्ध करीत आहोत.

कंपनी कायद्याच्या गुंतागुंतीच्या तरतुदीपासून लांब रहाण्यासाठी या कायद्याखाली या संस्था नोंदवल्या न जाता भागीदारी संस्थेच्या स्वरूपात रहाणे पसंत करतात. जाहिरातींमधून कबूल केलेल्या प्रचंड दराने ठेवींवर व्याज देणे वस्तुतः शक्य नसले तरी जास्त प्रमाणात ठेवी गोळा होईपर्यंत जमा ठेवींवर या संस्थांना व्याज द्यावे लागते. त्यासाठी कुठलीही तरतूद न ठेवता नव्या ठेवींच्या रकमेतून जुन्या ठेवींवरचे व्याज दिले जाते. परंतु एक वेळ अशी येते की, ठेवीदार आपले पैसे परत मागू लागतात, नेमक्या ह्याच वेळी आपले चंबुगबाळे आवरून या संस्था बंद केल्या जातात. आणि तोपर्यंत मालकवर्गाने भरपूर श्रीमंती प्राप्त केलेली असते. ज्या ठेवीदारांचे पैसे बुडालेले असतात, त्यांना मात्र हात चोळीत बसण्याशिवाय गत्यंतर नसते. यासाठी केंद्रीय अर्थखाते, रिझर्व्ह बँक आणि राज्य सरकारे यांनी एकत्रितपणे कायम स्वरूपी इलाज करणे आवश्यक आहे. त्या दिशेने काही पावले देखील उचलण्यात आलेली आहेत.

विविध वृत्तपत्रातून सध्या ठेवीदारांना फसवून बंद पडणाऱ्या संस्थांची वृत्ते येत आहेत. या संस्थांची एक विशिष्ट कार्यपद्धती आहे आणि कायद्यातील काही ठराविक पळवाटांचा आधार त्या घेत असतात. प्रत्येक गुंतवणूकदाराने म्हणूनच सावधान राहणे आवश्यक ठरते. या संदर्भातील संस्थांची माहिती, त्यांची कार्यपद्धती, कायद्यातील तरतूदी आणि रिझर्व्ह बँक, राज्य सरकारे आणि केंद्र या आर्थिक गुन्हेगारीविरुद्ध उचललेली पावले याबाबत लेख तीन भागात प्रसिद्ध करत आहोत.

या प्रदीर्घ लेखाच्या पहिल्या भागामध्ये फसवेगिरी करणाऱ्या कंपन्यांचे स्वरूप आणि थोडक्यात कार्यपद्धती आपण वाचली. या दुसऱ्या भागामध्ये अशा काही कंपन्यांची प्रत्यक्ष उदाहरणे आणि फसवणुकीचे प्रकार यांची माहिती देत आहोत. यावरून अशा कंपन्यांच्या लोकांना गंडवण्यासाठी कोणत्या युक्त्या-प्रयुक्त्या असतात, हे लक्षात येईल. अशा कंपन्यांची माहिती "इलेस्ट्रेटेड वीकली" आणि "अफेअर" सारख्या दर्जेदार नियतकालिकांकडून देखील प्रसिद्ध झालेली आहेत. म्हणूनच या प्रकाराचे गांभीर्य समजावून घेणे आवश्यक आहे.

बोगस कंपन्यांच्या गैरव्यवहारामुळे शासनापुढे अनेक प्रकारच्या समस्या उभ्या राहिलेल्या आहेत. लोकांचे अज्ञान, कायद्यातील त्रुटी आणि छोट्या-मोठ्या कारणांमुळे देशाच्या अर्थकारणाशी निगडित असलेला हा प्रश्न अधिकच गुंतागुंतीचा बनला आहे. एकटा दुकटा गुंतवणूकदार एकट्याच्या रकमेसाठी कंपनीला कोर्टात खेचण्यास असमर्थ ठरतो. पण म्हणून अशा गुंतवणूकदारांची संघटना बांधणे, हे काही सोपे काम नाही. रिझर्व्ह बँक आणि शासनाला या समस्येची गांभीर्याने झालेली जाणीव त्यांना या दिशेने काही कृती करण्यास भाग पडत आहे. तरीही गुंतवणूकदारांनी कंपनीमध्ये रक्कम गुंतवताना काही प्राथमिक गोष्टींची चौकशी करून पूर्ण सावधगिरीने पैसे गुंतवणे, हाच या प्रश्नावर खरा तोडगा आहे. गुंतवणूक करत असलेल्या कंपनीचा काळजीपूर्वक अभ्यास करणारे गुंतवणूक, रिझर्व्ह बँक, राज्य सरकारे आणि कायद्यातील तरतुदींशी कडकपणे अमलबजावणी या द्वारेच समस्या सोडवता येऊ शकेल.